# ५ डे बँकिंगच्या मागणीसाठी युएफबीयू अंतर्गत बँक कर्मचाऱ्यांचे आंदोलन

## रिठद येथून गाडीची नंबर प्लेट व डोमलाईट चोरी!

महासागर प्रतिनिधी

**रिसोड** - वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या रिसोड तालुक्यातील रिठद गावातील वाशिम रिसोड रस्त्यावर असलेल्या दि बुलढाणा अर्बन कॉपरेटिव बँक चेक कर्मचारी विवेकानंद शेषराव बन वय वर्ष ३५ यांची होंडा कंपनीची शाईन गाडी चा डोमलाईट व नंबर प्लेट अज्ञात चोरांनी गाडीची काढून नेली ही घटना दिनांक ३१ डिसेंबर रोजी सकाळी अंदाजे २ वाजून ४५ मिनिटांनी घडली.

विवेकानंद बन हे बँकेच्या बिल्डिंग मधील वरच्या माळयावर राहतात.



या गाडीची नंबर प्लेट व लाईटचा डोम ची चोरी ईरटीका गाडी मालक किंवा चालक यांनी चोरून नेल्याचे प्रथम दर्शनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याद्वारे लक्षात येते परंतु त्या गाडीचा नंबर ओळखू येत नसल्याने त्याबाबतची (गाडी बाबतची)माहिती वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनला देण्यात आली नाही. परंतु ही बाब सकाळी उठल्यावर लक्षात आल्यानंतर या चोरी गेलेल्या नंबर प्लेट द्वारे कोणताही अनुचित प्रकार चोरट्याने करू नये. किंवा गैरफायदा घेऊ नये. त्यासाठी वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशनला या बाबतचा तक्रार अर्ज विवेकानंद बन यांनी दिला आहे . चोरी गेलेल्या नंबर प्लेट व लाईट डोमच्या गाडीचा क्रमांक एम एच- २८बी आर- ३१७४ आहे. या बाबतचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

महासागर प्रतिनिधी

**वाशीम** - देश भरातील बँकांमध्ये ५ दिवसांचा आठवडा करावा या मागणी साठी विविध आंदोलन कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. दि. ३० डिसेंबर रोजी सर्व जिल्हा स्तरावर निदर्शने कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

यूनाइटेड फोरम ऑफ बँक युनियन (UFBU) यांच्या आवाहनानुसार ५-डे बँकिंग या एकमेव व अत्यंत महत्त्वाच्या मागणीसाठी आज वाशिम येथे बँक कर्मचाऱ्यांनी एकत्र येत आंदोलन केले. यावेळी बोलताना आंदोलन कर्त्यांनी सांगितले की, बँक कर्मचाऱ्यांची ५-डे बँकिंगची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यापूर्वी विविध आंदोलना दरम्यान ही मागणी




तत्वतः मान्य करण्यात आली असली, तरी अद्याप सरकारने याबाबत ठोस निर्णय घेतलेला नाही. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर UFBU ने केवळ या एकाच मागणीसाठी देशव्यापी आंदोलन कार्यक्रम जाहीर केला आहे. बँक कर्मचारी हे केवळ व्यवहार करणारे यंत्र नसून देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. सध्या बँकिंग क्षेत्रात कामाचा ताण प्रचंड वाढलेला असून डिजिटल बँकिंग, वाढती लक्ष्ये, ग्राहकांच्या अपेक्षा व सतत बदलणाऱ्या धोरणां मुळे कर्मचाऱ्यांवर मानसिक व शारीरिक ताण वाढत आहे. अशा परिस्थितीत ५ - डे बँकिंग ही अत्यावश्यक गरज असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. ५-डे बँकिंगमुळे कर्मचाऱ्यांचे आरोग्य सुधारेल, कुटुंबाला वेळ देता येईल, कामातील एकाग्रता व कार्यक्षमता वाढेल तसेच ग्राहक सेवेचा दर्जा अधिक चांगला होईल, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले.

जगातील अनेक विकसित देशांमध्ये तसेच भारतातील RBI, NABARD, LIC, UIC, SEBI यां सारख्या आर्थिक संस्थांमध्ये आणि केंद्र सरकारच्या बहुसंख्य कार्यालयां मध्ये ५ - डे वर्किंग पद्धत लागू असताना बँक कर्मचाऱ्यांना त्यापासून वंचित ठेवणे अन्याय कारक असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. सरकारने त्वरित हस्तक्षेप करून ५ - डे बँकिंगची अंमलबजावणी करावी, अन्यथा आगामी सर्व आंदोलन कार्यक्रम अधिक तीव्रतेने व १०० टक्के सहभागा सह राबवण्यात येतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनात मोठ्या संख्येने बँक कर्मचारी व संघटनेचे पदाधिकारी जवळपास ४० बँक कर्मचारी सहभागी झाले होते.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## उपविभागीय अधिकारी कार्यालय, कारंजा

प्रस्तुतकार ०४

दुरध्वनी क्रमांक ०७२५६-२९१५०० ई-मेल -sdokarija@gmail.com

क्रमांक: क.लि./मु.सं./कावि-३१३/२०२५ दिनांक:-२३/१२/२०२५

मा. जिल्हाधिकारी वाशिम यांचे पत्र क्र १४८/२०२१ दि. २४/०९/२०२१

### कलम-११

### अधिसुचना

(भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना भरपाई अधिनियम २०१३)

**भुसंपादन प्रकरण क्रमांक ०२/४७/२०२१-२२ मौजा वाटोद ता. मानोरा जि. वाशिम**

ज्याअर्थी, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम ३ मधील पोटकलम (e) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने महसूल व वन विभाग अधिसुचना क्रमांक **-MIS-11/2014/CR.77/A-2**, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यानंतर यापुढे याला सदरहु अधिसुचना संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करतांना (सदरहू कायदयाच्या कलम ३ मधील पोट-कलम झेड (ए) नुसार) जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा जास्त नसलेल्या जमीनीच्या बाबतीत त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना या कायदया अंतर्गत जमीन संपादन करण्यास शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणुन घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचित शासन म्हणून घोषीत करण्यात आले आहे. त्याअर्थि, अनुसूची-I मध्ये दर्शविलेल्या जमीनी, व्यापते त्याचा उक्त भूनी असा उल्लेख करण्यात येईल.) अनुसूची- II मध्ये नमुद केलेल्या सार्वजनिक प्रयोजना करीता आवश्यक आहे किंवा आवश्यक असल्याचा संभव आहे. (यापुढे ज्याचा उक्त सार्वजनिक प्रयोजन असा उल्लेख करण्यात येईल.) याबाबत जिल्हाधिकारी वाशिम यांची समुचित शासन म्हणुन खात्री झाल्यामुळे सदरहु कायद्याच्या कलम-२ च्या पोटकलम (I) नुसार सार्वजनिक कामाच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येत आहे. असे अधिसुचित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, सदरहु भुमि संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमि संपादित करतांना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोबत जोडलेल्या अनुसुचि-III मध्ये नमुद केले आहे.

आणि ज्याअर्थी, भुमी संपादन कायद्याअंतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादन करतांना सामाजीक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसुची - IV मध्ये नमुद केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, भूमी संपादन कायद्याचे कलम ४३, पोट-कलम (I) नुसार विस्थापितांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्याकरीता सोबत जोडलेल्या अनुसुचि - V मध्ये प्रशासकाचे विवरण नमुद केलेले आहे.

त्याअर्थी, आता, सदरटु कायद्याच्या कलम ११ चे पोटकलम (४) नुसार अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून सदरङ भूमि कायद्याच्या प्रकरण ४ खाली कार्यवाही पूर्ण होईपर्यंत कोणतेही व्यक्ती उक्त जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अशा जमीनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु, जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या भुमीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विषेश परिस्थीती मध्ये या पोट-कलमाच्या अमलबजावणी मधुन अशा भुमी मालकास सुट देऊ शकेल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीनी, या तरतुदीचे जाणिवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतिची जिल्हाधिका-याव्दारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदरहु भुमि संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट-कलम (५) अन्वये व, भुमी संपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वानवी भरपाई मिळण्याचा व पारर्दशकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त नियम असा करण्यात येईल.) चे नियम १० उप-नियम (३) अन्वये जिल्हाधिकारी भुमी अभिलेख अद्यावत घारण्याचे काग हाती घेतील.

आणि म्हणून त्याअर्थी, समुचीत शासन म्हणून जिल्हाधिकारी सदरहू कायद्याचे कलम ३. पोट-कलम (जी) अन्वये उपविभागीय अधिकारी तया भुसंपादन अधिकारी कारंजा लाड यांना पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची I

### भुमिचे वर्णन

भुसंपादन प्रकरण क्रमांक-०२/४७/२०२१-२२

गावाचे नाव- वाटोद ता. मानोरा जिल्हा- वाशिम

| अ.क्र. | सर्वे नं/गट नं. | ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे.आर) | संपादीत करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | ९४ पैकी | ६.३८ | १.८६ |
| | | एकुण | १.८६ |

### अनुसूची II

प्रकल्पाचे नाव - वाटोद ल.पा. योजना मौजे वाटोद ता. मानोरा जि. वाशिम

प्रकल्पाच्या कामाचा तपशिल - बुडीत क्षेत्रा करीता संपादीत करावयाच्या जमीनीचा प्रस्ताव मौजे वाटोद

सामाजिक फायदे - शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्याच्या सोई सुविधा होऊ शकते तसेच जमिनीच्या जलसाठ्यामध्ये पाण्याच्या पातळीत वाढ होते. सिंचन सुख सोई सुविधा होऊ शकते.

### अनुसूची III

बाधित व्यक्तीचे विस्थापनाच्या आवश्यकतेची कारणे - विस्थापनाची आवश्यकता नाही

### अनुसूची IV

**सामाजिक परिणाम निर्धारणाचा गोषवारा-**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४-अ, असाधारण क्रमांक, ३८, दिनांक १३/०३/२०१५ नुसार सदरचा प्रकल्प सिंचन स्वरुपाचा असल्याने पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) अधिनियमाचे प्रकरण दोन व प्रकरण तीन मधील तरतुदी लागू करण्यापासुन सुट आहे.

### अनुसूची V

नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती

(१) ज्या अधिका-याची प्रशासक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम - आवश्यकता नाही.

(२) प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता - निरंक

(३) प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसुचनेनुसार झाली आहे. त्याचा तपशिल - निरंक

टिप- उक्त जमीनीचा / जमीनीच्या योजनेचे (**Plan** चे) निरीक्षण उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, कारंजा लाड यांच्या कार्यालयात करता येईल.

दिनांक :- २३/१२/२०२५

ठिकाण :- कारंजा लाड

(कैलास देवरे)

उपविभागीय अधिकारी तथा

भुसंपादन अधिकारी, कारंजा

जिमाका/वाशिम/जाहिरात/१०८/२०२५

RNI NO. MAHMAR/2010/35844 Mahasagar Washim

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Mahatma Phule Market, Palm square. Head Office Phone-9822870023. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale. Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Vinod Tayade Mob No. 9563645555 (Responsible for editorial as per PRB act).

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक MAHMAR/2010/35844 महासागर वाशिम

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, महात्मा फुले मार्केट, पाटणी चौक, वाशिम येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : विनोद तायडे, फोन : ९५६३६४५५५५ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

